# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

## व्दितीय सत्र परीक्षा 2019–20

विषय – हिंदी

समय –2.½ घंटे | वर्ग – 7 (B) | गुण – 50

---

गदय विभाग (10)

**प्रश्न 1ला अ पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती कराः**

1) **आकृतीबंध पूर्ण करा.** (1)

1) शेख महंमदचे दुकान
- विक्री याची व्हायची → [ ]
- याच्या जवळ होते → [ ]

शेख महंमदचं एक छोटंसं दुकान होतं. तो वह्यांची किरकोळीनं विक्री करायचा. दरवर्षी जून महिन्यात मी त्याच्याकडून मोठ्या संख्येने वह्या विकत घेत असे आम्ही त्या झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वाटत असू. त्याचं दुकान आमच्या ऑफीसच्या जवळ होतं. दुकानाची जागा भाड्याची होती. शेख महंमद फार संकोची स्वभावाचा होता. तो वह्या आणून आमच्याकडे पोहचवायचा. आमचा चेक तयार झाला, की आम्ही त्याला तसं कळवायचो. मग तो येऊन चेक घेऊन जायचा.

2) **लेखिका वह्या विकत घेत** (1)
- 1) या महिन्यात ––––
- 2) वाटप येथे करीत –––

3) **चौकटी पूर्ण करा** (1)

1) भाड्याची असणारी [ ]

2) शेख महंमदचा स्वभाव [ ]

**स्वमतः** (2)

4) या पाठातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दात लिहा

**2) ब पुढील उतारा वाचून कृती करा**

त्याच दिवशी शाळेत विज्ञान मंडळातर्फे प्रसिद्ध विज्ञान कथाकार श्री. अनिल घोटे यांचं व्याख्यान होतं त्यांनी अंतराळासोबत परग्रहावरील जीव सृष्टीसंबंधीची कथा सांगितली. राजूनं त्यांची कथा बारकाईनं ऐकली. त्यानंतरचा राजूचा संपूर्ण दिवस अस्वस्थतेत गेला. त्यातच त्यानं एक ठाम निश्चय केला. राजूच्या ठाम निश्चयाला त्याच्या बाबांचाही पाठींबा मिळाला. राजूच्या शाळेतील पाटीलसरांनी राजू व त्याच्या बाबांना प्रसिद्ध ा शास्त्रज्ञ डॉ. अनिल घोटे यांच्याकडे नेले.

1) **शब्दजाल पूर्ण कराः** (1)

शाळेत
- यांचे व्याख्यान होते — [ ]
- या मंडळातर्फे — [ ]

**2) चौकटी पूर्ण करा.** (2)

1) डॉ. घोटे यांनी यासंबंधी कथा सांगितली → ☐

2) राजूच्या निश्चयाला पाठिंबा देणारे → ☐

3) राजूला व बाबांना डॉ. घोटे यांच्याकडे नेणारे → ☐

4) राजूने कथा ऐकली → ☐

**स्वमत**

3) चौकसपणा व जिज्ञासू वृत्ती हे गुण तुम्हाला महत्त्वाचे वाटतात का? का ते सांगा. (2)

**पदय विभाग** **(10)**

**प्र. 2 कविता वाचून पुढील कृती पूर्ण करा.**

अ) असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर
नको गुलामी नक्षत्रांची, भिती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर!
पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना
संकटासही ठणकावूण सांगावे, ये आता बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर!
करुनी जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला दयावे उत्तर!

**1) चौकटी पूर्ण करा.** **(1)**

1) छातीवर हे लावावे → ☐

2) यांची भीती बाळगू नये → ☐

**2) पुढील ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा:** (2)

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना

**3) कवीने या कवितेतून दिलेला संदेश तुमच्या शब्दांत लिहा.** **(2)**

**ब) कविता वाचून पुढील कृती करा.**

शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे विषय आहे गाण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा
माती बनुनी सरसर येती, वर्षेमधल्या सरीतुनी

माळ ओवते, निसटुन जाते, बावरते जणू परी कुणी
या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जीण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।1।।
आभाळातिल ह्या मोत्याने, माती मधुनी पिकती मोती
निसर्ग जाणी मोल तयाचे, तुम्ही माणसे का मग कोती?
संचय करता तिजोरीतल्या, खणखणत्या त्या नाण्यांचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा।।2।।
कशास ऐसा वेडाचाळा, स्वतः होऊनी ठगण्याचा
दृष्टीकोन तू बदल आता रे, निसर्गास हया बघण्याचा
तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा

**1) चौकटी पूर्ण करा.** **(1)**

1) थेंबाची माळ ओवणारी जणू काही → [ ]

2) पाण्याचे मोल जाणणारा → [ ]

**2) संकल्पना स्पष्ट करा.** (2)

1) आभाळातिल मोती.

2) मातीतील मोती.

**3) स्वमतः**

माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा, या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा.
व्याकरण विभाग

**प्र. 3 रा पुढील उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** (5)

सृष्टी हा मानवाला मिळालेला अनमोल नजारा आहे. धरतीला माता म्हटले आहे. धरणी माता मानवाचे पालन व पोषण करते. म्हणून पर्यावरणाचे रक्षण करणे व सृष्टीचे सौंदर्य कायम राखणे, हे आपले आद्य कर्तव्य आहे उन्हाळा पावसाळा आणि हिवाळा या तीन मुख्य ऋतुंमध्ये सृष्टी वेगवेगळी रूपे धारण करते. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी जंगलतोड न करणे व पाण्याचे प्रवाह साठवणे, हे उपाय आपण करायला हवेत. निसर्गाला ओरबाडणे हे कधी ही हानिकारक आहे. झाडे लावली पाहिजेत, त्यांना जगवले पाहिजे आपल्या वाईट सवयी सोडून द्यायला हव्यात. आपला परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवायला हवा.

**प्रश्न**

1) मानवाला मिळालेला अनमोल नजराणा कोणता आहे? (1)
2) आपले आद्य कर्तव्य कोणते? (1)
3) सृष्टी वेगवेगळी रूपे कधी धारण करते? (1)
4) निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आपण कोणते उपाय करायला हवे? (1)
5) आपला परिसर आरोग्यदायी राहण्यासाठी काय करायला हवे?

**व्याकरण विभाग** **(10)**

**प्र. 4 अ) खालील सुचनांप्रमाणे उत्तरे लिहा (कोणतेही पाच)** (5)

1) पाऊस पडला. (उद्देश्य, विधेय लिहा)

2) पाऊस पडला या वाक्याचे उद्देश्य विस्तार, विधेय विस्तार लिहा

3) घोड्यावर बसून राजा आला. (अधोरेखित शब्दाचे सामान्यरूप लिहा)
4) दररोज व्यायाम करावा. (क्रियाविशेषण अव्यय लिहा)
5) शाळेबाहेर मुले जमली. (शब्दयोगी अव्यय लिहा)
6) गाडी आली, परंतु महेश आला नाही. (उभयान्वयी अव्यय लिहा)
7) शाबास! छान चित्र काढलेस तू. (केवल प्रयोगी अव्यय लिहा)

**ब) पुढील वाक्याचे प्रकार ओळखा (कोणतेही चार) (4)**

1) तुझ्या शाळेचे नाव काय आहे?
2) मी दररोज शाळेत जाते.
3) शाबास! जिंकलात तुम्ही!
4) सगळयांनी रांगेत उभे राहा.
5) वादळ आल्यामुळे झाड पडले.
6) जर तू अभ्यास करशील तर तू पास होशील
7) पाऊस पडला आणि आंगण ओले झाले.

**क) पुढील कंसातील म्हणी दिलेल्या आहेत. वाक्यांशी संबंधित म्हण लिहा (कोणतेही दोन) (1)**


(पळसाला पाने तीनच, थेंबे थेंबे तळे साचे, गर्वाचे घर खाली, कामा पुरता मामा)

1) थोडे थोडे जमवून मोठा संचय करणे
2) सर्वत्र परिस्थिती समाण असणे
3) हुशारकी मारणाऱ्याचा पराजय होतो.

**उपयोजित लेखन** (15)

**प्र. 5 पुढीलपैकी एका विषयावर आठ ओळी निबंध लिहा (6)**

1)




2) पाऊस पडलाच नाही, तर .......
पाण्याचा दुष्काळ – दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम – शेती व उदयोगधंदे यांच्यावर होणारा परिणाम – नदी , नाले, विहिरींची स्थिती – सजीवांवर होणारा परिणाम

3) पिंजऱ्यातील पोपटाचे मनोगत.
मुद्देः माणूस पोपटाला पिंजऱ्यात का ठेवतो? स्वतःच्या आनंदासाठी – पिंजऱ्यातील पोपटाला काय काय मिळते – काय हवे असते – पोपटाचे मागणे काय असेल?

**ब) पत्रलेखन** **(5)**

1) आंतरशालेय क्रीडामहोत्सवात धावण्याच्या स्पर्धेत तुमच्या मैत्रिणीने प्रथम क्रमांक मिळवला आहे तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

2) एस. टी स्टॅण्ड जवळील कचरा पेटीच्या दुर्दशेची एस.टी व्यवस्थापकांकडे तक्रार करणारे पत्र लिहा.

**क) कथालेखन** **(4)**

शीर्षकावरून किंवा म्हणीच्या आधारे कथा लिहा 'गर्वाचे घर खाली' या म्हणीचा अर्थ लक्षात घ्या व तो अर्थ स्पष्ट करणारी कथा लिहा.

**किंवा**

**संवाद**

दोन शास्त्रज्ञ व राजू यांच्यात काय बोलणे झाले असेल हे, ते संवादरूपाने लिहा. (पाठ्यपुस्तकातील विज्ञानकथा या द्वारे संवाद पूर्ण करा.)

***